ज्ञानदीप लावू जगी

# पुणे नगर वाचन मंदिर

स्थापना : ७ फेब्रुवारी १८४८

email : pnvm1848@gmail.com
www.punenagarvachan.org

पुस्तकाचे नाव : श्रीक्षेत्र नासिक येथें चांद्रसेनीय कायस्थ प्रभु जातीच्या तारीख २२/२३ आगष्ट सन १८९१ रोजीं भरलेल्या परिषदेची हकीकत

प्रकाशन वर्ष : १८९१

मूळ ग्रंथ प्रत : शिक्षण प्रसारक मंडळी, पुणे

पुणे नगर वाचन मंदिर

अंकेक्षण (डिजीटायझेशन) प्रकल्प

अंकेक्षण रूपांतर – २०२४

# श्रीक्षेत्र नासिक

येथें

चांद्रसेनीय कायस्थ प्रभु जातीच्या

तारीख २२ | २३ आगष्ट

सन १८९१ रोजीं

भरलेल्या परिषदेची

## हकीकत.

ग्रंथ संग्रह

नासिक येथें “नासिकवृत्त” छा० छा०

सप्टंबर सन १८९१.

## ॥ श्रीगजानन ॥

### प्रोसिडिंग श्रीक्षेत्र नासिक येथें चांद्रसेनी कायस्थ प्रभु मंडळीची सभा भरून ठराव झाले त्याबद्दल:—

१. आज रोजीं सभेकरितां मंडळी हजर आहे ती.

१ वामनराव महादेव वकील, सिन्नर.
२ परशराम जयराम गुप्ते वकील, सिन्नर.
३ आत्माराम जयराम गुप्ते, पनवेल.
४ आत्माराम खंडेराव वैद्य, हेडक्लार्क कलेक्टर आफिस नासिक.
५ बाळकृष्ण सखाराम चिटणीस, हेडक्लार्क जज्जकोर्ट नासिक.
६ यशवंत रामचंद्र प्रधान, पेनशनर नासिक.
७ वासुदेवराव श्रीपत शिळोत्री, राहणार साई तालुका पनवेल.
८ अमृतराव बाबा कर्णीक, राहणार साई तालुका पनवेल.
९ राजाराम बाळकृष्ण टिपणीस, सेकंडक्लार्क कलेक्टर आफिस नासिक.

१० गोविंद चिमणाजी गडकरी वकील, राहणार निफाड.

११ आत्माराम अनंत गडकरी, सब रजिस्ट्रार दिंडोरी.

१२ लक्ष्मण शिवराम रणदिवे, क्लार्क कलेक्टर आफिस नासिक.

१३ रामराव महिपत मोकाशी, पेनशनर नासिक.

१४ रावजी गणेश जयवंत, शिरस्तेदार डिस्ट्रिक्ट डेप्युटी कलेक्टर नासिक.

१५ कृष्णराव सिताराम कर्णीक, कारकून मामलेदारकचेरी नासिक

१६ विनायक सिवाराम मुल्हेरकर, क्लार्क डिविजनल फारेस्ट आफिस नासिक

१७ केशव नारायण चिंचघरकर, ओपियम अपकारी इन्स्पेक्टर नासिक.

१८ यशवंत महिपत खारकर, हेडक्लार्क रजिस्ट्रार आफिस नासिक।

१९ विनायक माधव कर्णीक, कारकून कलेक्टर आफिस नासिक.

२० नारायण विनायक राजे, कारकुन रजिस्ट्रार आफिस नासिक.

२१ यशवंत माधव कर्णीक, सुभेदार तालुका सिन्नर.

२२ गणपतराव सखाराम कारखाननीस, सबरजिस्ट्रार निफाड.

२३ विठ्ठल महादेव कारकून, चीफकान्स्टेबल वा० पेठ.

२४ दिनकर मोरेश्वर गुप्ते, क्लार्क जी. आय. पी. रेलवे कंपनी मुंबई.

२५ यशवंत जिवाजी डबीर, स्कुलमास्तर मुंबई.

२६ नारायण यशवंत प्रधान, क्लार्क कलेक्टर आफिस नासिक.

२७ बाळकृष्ण विठ्ठल टिपणीस, कारकून चीफकान्स्टेबल नाशिक.

२८ रामकृष्ण जनार्दन क्लार्क, सानिटरी आफिस नासिक.

२९ वामन सिताराम चिंचघरकर, कारकून मामलतदार कचेरी चांदवड.

३० गणेश गोपाळ प्रधान, क्लार्क म्युनिसिपालिटी नासिक.

३१ नारायण रघुनाथ विळेकर, नासिक.

३२ बाळकृष्ण आप्पाजी गुप्ते, पेनशनर नासिक.

३३ सदाशिव बाळकृष्ण गुप्ते, नासिक.

३४ मार्तंड महिपत मोकाशी, नासिक.

३५ खंडेराव नारायण चिटणीस, वसई.

३६ विश्वनाथ दामोदर गुप्ते, वसई.

३७ वेदमूर्ति राजेश्री गंगाधरभट मुरारभट क्षेमकल्याण, तीर्थोपाध्याय नासिक.

३८ वेदमूर्ति राजेश्री सखारामभट शितारामभट क्षेमकल्याण तीर्थोपाध्याय नासिक.

३९ शंकर गोविंद गडकरी, नासिक.
४० रामकृष्ण विठ्ठल टिपणीस, "
४१ गोविंद कृष्ण कर्णीक, "
४२ अनंत रामचंद्र प्रधान, "
४३ अनंत सखाराम गडकरी, "
४४ विनायक आत्माराम वैद्य, "
४५ नारायण आत्माराम वैद्य; "
४६ गोपाळ गोविंद गडकरी, "
४७ रघुनाथ गोविंद गडकरी, "
४८ रघुनाथ गोपाळ प्रधान, "
४९ आत्माराम रामचंद्र प्रधान, "
५० रामकृष्ण रावजी जयवंत, "
५१ जगन्नाथ विनायक मुल्हेरकर, "

येणेंप्रमाणें मंडळी हजर असोन कामाची सुरुवात होऊन ठराव झाले ते.

२. श्रीक्षेत्र नासिक येथें चांद्रसेनी कायस्थ प्रभु मंडळीचे हरएक बाबतीसंबंधीं विचार करण्याकरितां सभा स्थापन व्हावी असें सर्वानुमतें ठरलें.

३. या सभेचें काम चालविण्याकरितां खालीं लिहिलेले गृहस्थांची म्यानेजिंग कमिटी नेमण्यांत आली तीः—

## अध्यक्ष.

वामनराव महादेव प्रधान वकील.

## मेंबर.

१. आत्माराम खंडेराव वैद्य. खजीनदार.
२. बाळकृष्ण सखाराम चिटणीस.
३. कृष्णराव जयराम गुप्ते वकील.
४. गोविंद चिमणाजी वकील.
५. यशवंतराव रामचंद्र प्रधान.
६. विनायक सिताराम मुल्हेरकर.
७. यशवंत महिपत खारकर.

## सेक्रेटरी.

१. गणेश गोपाळ प्रधान.
२. विनायक माधव कर्णीक.

येणेंप्रमाणें म्यानेजिंग कमिटी नेमली आहे. प्रत्येक तिमाहींत अगर जरूर पडेल तर दरम्यान अध्यक्षाचे संमतीनें सेक्रेटरी यानें म्यानेजिंग कमिटी भरवावी. सर्व पत्रव्यवहार सेक्रेटरी यांचे सहीनें व्हावा. चार मेंबर हजर झाले ह्मणजे कमिटीचें कोरम झालें असें समजणेंचें आहे. या कमिटीचे प्रोसिडिंगाचें एक बुक ठेवावें.

येणेंप्रमाणें काम करून रात्रौ बारा वाजले सबब राहिलेलें सभेचें काम उदईक सकाळीं सात वाजतां सुरू होईल ह्मणोन अध्यक्षानें सुचविल्यावरून कमिटीचें काम तहकूब तारीख २२ आगष्ट सन १८९१ शनिवार रात्रौ ९ ते १२ वाजे तोंपर्यंत.

तारीख २३ आगष्ट सन १८९१
रविवार सकाळीं ८ ते १२ वाजेपर्यंत.

आज रोजीं काल ठरल्याप्रमाणें सर्वत्र मंडळी हजर असोन कामास सुरवात झाली आणि ठराव झाले ते:—

४. (अ) लग्नसंबंधांत मुलास हुंडा द्यावा लागतो. हा वधुपक्षास विशेष खर्च आहे. यासंबंधानें विचार करितां हा प्रघात हुंडा घेणाराचे योग्यतेस कमीपणा आणणारा असोन अशास्त्र आहे करितां हुंडा घेण्याची रीत बंद व्हावी असें सर्वांनुमतें ठरलें.

(ब) संमतीवयाचे कायद्यापासून बचाव होण्याकरितां होतां होईल तोंपर्यंत बारा वर्षांचे आंतील वयाचे मुलींचें लग्न होऊं नये अशी खबरदारी घ्यावी, असा ठराव बहुमतानें झाला.

५. आपले लोकांची निकृष्ठ स्थिति कांहीं अंशीं तरी दूर होण्यासाठीं कांहीं विचार करणें योग्य आहे असें सर्वांनुमतें ठरलें; परंतु कोणते प्रकारचे उपाय करणें योग्य

आहेत हा विषय महत्वाचा असलेकारणानें म्यानेजिंग कमिटीनें ठिकठिकाणचे लोकांचा अभिप्राय आणवून त्यांचा विचार पुढील सभेवर करणेचें तहकूब ठेवलें.

६. नासिक येथील चांद्रसेनीय कायस्थ प्रभुंच्या धर्मशाळेसंबंधीं झालेल्या हकीकतीचा रिपोर्ट वाचून दाखविला तो सर्वानुमतें पसंत होऊन छापवून प्रसिद्ध करण्याचें ठरलें. सदर्हू संबंधानें राजश्री विनायक माधव कर्णीक यांनीं विशेष श्रम केल्याबद्दल त्यांचे व उदारधीर कृपासागर रावसाहेब वासुदेवराव श्रीपत शिळोत्री यांचे औदार्यासंबंधानें आभार मानिले.

७. धर्मशाळेचें सत्कृत्य कृपासागर रावसाहेब वासुदेव श्रीपत शिळोत्री यांनीं केलें, याकरितां त्यांस मानपत्र देण्याविषयीं सर्वानुमतें ठरलें. सदर्हू मानपत्र देणें तें आज येथें जमलेला समाज फार कमी आहे करितां पुढील सभेचा समाज जास्त भरण्याचा संभव आहे. त्या सभेंत दिलें जावें असा सर्वानुमतें ठराव झाला.

८. रा० विनायक माधव कर्णीक यानें केलेला खर्च, धर्मशाळेचा फंड वसूल करणें वगैरेबद्दल केला आहे सबब त्यांचे यादीप्रमाणें तो खर्च खजीनदार यानें तपासून धर्मशाळा फंडांतून द्यावा.

९. या सभेचा व पुढील सभेपर्यंत होणारा छापण्याचा

व टपाल वगैरे खर्च, व या सभेस आलेल्या मंडळींची व्यवस्था राखण्याच्या संबंधाचा खर्च मिळून एकंदर खर्च नासिक जिल्ह्यांतील मंडळीनें वर्गणी करून पुरा करावा, असें सर्वानुमतें ठरलें.

१०. पुढील सभा येत्या गुडफ्रायडेच्या रजेंत नासिक येथें भरण्याचा सर्वानुमतें ठराव झाला.

११. बाहेर गांवाहून सभेकरितां मुद्दाम होऊन आलेले लोकांचे व अध्यक्षांचे व विशेषेंकरून या कामीं खटपट करणारे राजश्री विनायक माधव कर्णीक, व या संबंधानें उत्तेजन देणाऱ्या मंडळींचे आभार मानून सभेचें काम पुरें करण्यांत आलें.

सदर्हू प्रोसिडिंगाच्या प्रती छापवून हजर असलेल्या सभासदांस घ्याव्या; व आपले ज्ञातींतील ठिकठिकाणचे लोकांकडे ह्याच्या प्रती पाठवून यासंबंधानें त्यांचें काय मत आहे हें म्यानेजिंग कमिटीनें आणवून पुढील सभेंत त्या सर्वांचें एकीकरण करण्याविषयीं ठरविण्यांत आलें आहे.

तारीख २३ आगष्ट सन १८९१ रविवार बारा वाजतां मुक्काम नासिक.

विनायक माधव कर्णीक,
चिटणीस.

वामनराव महादेव प्रधान
वकील, चांद्रसेनीय कायस्थ प्रभु मंडळीचे सभेचे
(नासिक येथील) अध्यक्ष.

# नासिक येथील धर्मशाळा फंडाचा रिपोर्ट.

श्रीक्षेत्र नासिक हें एक मोठें पुण्यक्षेत्र असल्याकारणानें येथें पुष्कळ हिंदु लोक यात्रेकरितां येतात. त्याचप्रमाणें चांद्रसेनीय कायस्थही वारंवार यात्रा अगर धर्मकृत्यें करण्याकरितां येतात. क्रियेसंबंधीं धर्मकृत्यें म्हटलीं म्हणजे श्रीगोदावरीचे कांठीं करावयाचीं असल्याकारणानें शीत, उष्ण व पर्जन्य ह्या त्रिविध तापापासून रक्षण होण्याकरितां छाया असणें हें अवश्यक आहे. अशी एक जागा आहे परंतु ती ब्राह्मण लोकांकडे असल्याकारणानें तिचा उपयोग आपणास होत नाहीं. कारण तेथें ते लोक आपल्या जातीपैकीं कोणासही कांहीं कर्म करूं देत नाहींत. अर्थात गोदावरीचे कांठीं खडकावर बसून सर्व कृत्यें करावीं लागत असत. त्यांत पर्जन्यकाळांत वरून पाऊस व खालून पाणी यांचे योगानें किती त्रास होतो याचा प्रत्यक्ष अनुभव घेणें दुर्दैवानें ज्यांस भाग पडलें असेल तेच जाणत असतील. उन्हाळ्यांत ऐन दोनप्रहरचें ऊन व खडक तापल्यामुळें त्याचा ताप, तसेंच हिवाळ्यांत गार वारा ह्यापासून इतका त्रास होतो कीं पुष्कळांस हीं कृत्येंच करूं नयेत असेंही वाटतें

ह्याप्रमाणें, जे आपले जातिबांधव येथें हीं कृत्यें करावयाचे उद्देशानें येतात, त्यांची स्थिति होते. त्यापासून आपले जातिबांधवांस सोडविण्याचे उद्देशानें आपल्याच जातीच्या उपयोगाकरितां येथें एक धर्मशाळा बांधावी, अगर सोईवार एखादी इमारत मिळेल तर ती विकत घेऊन जातीच्या उपयोगाकडेस ठेवावी असें येथें नोकरीनिमित्त असलेले आपले जातीचे लोकांचे मनांत आल्यावरून आपले जातीची एक सभा तारीख १ माहे जुलई सन १८८८ राजीं भरली. त्या सभेंत असें ठरलें कीं, आपले लोकांस हीं कृत्यें करण्यास येथें किती अडचणी येतात त्या आपल्या गांवोगांवचे जातिबांधवांस विनंतिपत्रानें कळवून यथाशक्ति त्यांची मदत ह्या अडचणी दूर करण्याकरितां व एक धर्मशाळा करण्याकरितां मागावी. त्याचप्रमाणें आणखी असें ठरलें कीं, आपले जातिबांधवांकडून जो पैसा वसूल होईल त्याची व्यवस्था करणें व धर्मशाळा बांधणें अगर आयती मिळाल्यास विकत घेणें वगैरे कामाकरितां एक सतत्ची सभा स्थापन व्हावी. ह्याप्रमाणें रा० रा० सखाराम दत्तात्रेय पेनशनर मामलतदार यांचे अध्यक्षतेखालीं येथें ही सभा स्थापन होऊन वर लिहिल्याप्रमाणें विनंतिपत्रें गांवोगांवीं पाठविण्यांत आलीं त्यांत येथें कशा अडचणी येतात त्यांचा खुलासा केला आहेच.

पुढें दोन वर्षेपर्यंत ह्या सभेचे सभासदांनीं आपापले इ-

ष्टमित्र व स्नेही वगैरे मंडळीस अनेक पत्रें पाठवून ह्या कृत्यास योग्य मदत करण्याबद्दल विनंति केली, परंतु कांहीं उपयोग झाला नाहीं असें म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं.

शेवटीं असें नुसतें पत्रोपत्रीं काम व्हावयाचें नाहीं, तर कोणी आपला इसम आपले मुख्य मुख्य वस्तीचे गांवीं पाठवून येथील अडचणीचें चित्र आपले जातिबांधवांपुढें प्रत्यक्ष मांडल्यावांचून ह्या कामास मदत मिळावयाचा संभव नाहीं असें सभेस वाटल्यावरून ह्या कामीं सभेच्या चिटणीसांपैकीं रा० रा० विनायक माधव कर्णीक यांचे अंगचे गुण पाहून त्यांची योजना सभेनें केली.

विनायकराव यांणीं आपल्या खाजगी अडचणी व गैरसोई यांजकडे लक्ष न देऊन सभेनें जें काम त्यांजकडे सोंपविलें होतें त्याजकरितां काया-वाचा-मनेंकरून झटण्याचा निश्चय करून तीन महिन्यांची रजा घेऊन आपले खर्चानें गांवोगांव फिरून सभेचे कामीं अश्रांत परिश्रम केले तेणेंकरून ह्या कामीं आपली निवड करणारांस आपली निवडणूक केल्याबद्दल धन्यता वाटावी असें केलें.

ह्याप्रमाणें हे गृहस्थ फिरत असतां मुक्काम साई ता० पनवेल जि० कुलाबा येथें रा० रा० वासुदेव श्रीपत शिळोत्री ह्या उदार गृहस्थांची गांठ पडली. त्यांनीं विनायकराव यांजकडून येथील सर्व हकीकत ऐकून घेऊन ह्या कामीं सर्व यश एकट्यानेंच घेण्याचा निश्चय केला. येथें श्रीगंगेचे

कांहीं एक दुमजली इमारत, जिचा खालचा भाग दगडी आहे अशी बिकण्यास तयार आहे ती जर विकत घेऊन सार्वजनिक कामाकरितां दिली तर असलेली अडचण दूर होईल असें विनायकरावांनीं कळविल्यावरून त्यांनीं येथें येऊन सदर्हू इमारत पाहिली व रुपये २२०० शास ती विकत घेऊन तिचे खालचे भागावरील (ह्मणजे जो दगडी भाग आहे त्यावरील) आपली सत्ता निवृत्त करून चांद्रसेनीय कायस्थ प्रभु जातीच्या उपयोगास दिली आहे. आपल्या जातीकरितां सार्वजनिक कृत्य केल्याचें कायस्थांत हें पहिलेंच उदाहरण रा० रा० वासुदेवराव यांचें आहे. त्याबद्दल त्यांची स्तुति करावी तेवढी थोडीच आहे. असो.

धर्मशाळेचे कामाकरितां आजपर्यंत गांवोगांवचे वर्गणीचे आंकडे ८७९ रुपयांचे पडले आहेत, परतु वसूल फक्त ४५६ रुपये आजपर्यंत झाला असून त्यापैकीं खर्च रुपये १०३-३-६ झाला आहे. बाकी शिल्लक ३५२ रुपये १२ आणे ६ पै आहेत. यापैकीं २३ रुपये पनवेलीस वसूल होऊन पावती दिलेला अद्याप आला नाहीं. जमेची नांवनिशीवार व खर्चाची तपशीलवार यादी सोबत जोडल्या आहेत.

इमारतीची जी अडचण होती ती दूर झाली. आतां विशेष कांहीं कर्तव्य राहिलें नाहीं, असें कदाचित सकृद्दर्शनीं कोणास वाटेल परंतु घेतलेले इमारतीची नेहेमीं झाड-

सारव, चाळचाळाई, रंगरंगोटी वगैरे वार्षिक व आकस्मिक दुरस्ती ह्यांजकडे लक्ष दिलें नाहीं तर थोडकेच काळांत दूर झालेली अडचण पुनः येईल. तसें होऊं नये ह्मणून तिचे दुरस्तीकरितां पुरे इतकी वार्षिक रक्कम तिकडे खर्च करणें भाग आहे. म्हणजे ज्या रकमेचें व्याज तिचे वार्षिक दुरस्तीला पुरेल इतकी रक्कम जमवून ब्यांकेंत ठेवून त्या व्याजांतून हा खर्च व्हावा असें केलें पाहिजे. तेव्हां वर्गणी जमा करण्याचें काम तसेंच बंद पडूं देऊं नये. प्रत्येक जातिबांधवानें हें आपलें कर्तव्य आहे असें समजून ह्या कामीं झटावें ही त्यांस विनंति आहे.

ह्याप्रमाणें ह्या सभेनें आजपर्यंत केलेले कामाची हकीकत आहे. एक गोष्ट वरती कळविणें राहिली ती ही कीं, रा० रा० सखाराम दत्तात्रेय ह्यांचे अध्यक्षतेखालीं प्रथम ही सभा स्थापन झाली. परंतु ते आपले गांवीं रहावयास गेल्यामुळें सभेचे नेहमीचे कामास अडचणी येऊं लागल्या. करितां ता० १२ माहे जानेवारी सन १८९१ रोजीं सर्वानुमतें असें ठरलें कीं, या सभेचें अध्यक्षत्व रा० रा० वामनराव महादेव प्रधान, वकील, कोर्ट सिन्नर यांजकडे द्यावें. त्याप्रमाणें तें त्यांजकडेस दिलें आहे.

शेवटीं सर्व जातिबांधवांस अशी विनंति आहे कीं; ज्याकडे आतां वर्गणीची बाकी येणें राहिली असेल किंवा ज्या कोणास या सत्कृत्याकडे आपल्या कमाईपैकीं कांहीं अंश

खर्च करण्याची इच्छा असेल त्यांनीं विलंब न लावितां रक्कम रवाना करण्याची तजवीज करावी.

कळावें, ता० २२ माहे आगष्ट सन १८९१.

आपला,

नारायण विनायक राजे, चिटणीस. } वामनराव महादेव प्रधान, अध्यक्ष

———

# एकंदर जमाखर्चाचें तेरीज.

| जमा. | | खर्च. | |
|---|---|---|---|
| १३२ | नासिक. | १२॰१४॰६ | टपाल खर्च. |
| ५ | निफाड. | ॰८ | मनीऑरडर. |
| ६०॰८ | उरण. | ४४॰१० | छापणावळ: |
| ६ | बेलापूर. | ५॰१ | सन्मान प्रीत्यर्थ. |
| ५० | सातारा. | २५ | स्टॉम्प् खरेदी. |
| २५ | माटुंगें. | १५ | तारेचा व वाट खर्च. |
| २३ | पनवेल. | | |
| २५ | कोल्हापूर. | ॰२ | कोर्टफी स्टॉम्प. |
| १० | सिन्नर. | २३ | पनवेलपैकीं वसूल येऊन पावत्या देण्यांत आल्या, परंतु तो पैसा नासिक येथें त्यानीं पाठविला नाहीं तो वजा. |
| ३५ | मालेगांव. | | |
| १० | भगूर. | | |
| ७४॰८ | मुंबई. | | |
| ४५६ | | १२६॰३॰६ | |
| | | ३२९॰१२॰६ | शिल्लक. |
| | | ४५६ | |

| नंबर. | वर्गणीदाराचें नांव व रहाण्याचें ठिकाण. | वर्गणीची रक्कम. | वर्गणीची वसूल झालेली रक्कम |
|---|---|---|---|
| १ | वामन महादेव वकील, कोर्ट सिन्नर. | ३० | २५ |
| २ | आत्माराम खंडेराव वैद्य, नासिक. | २५ | २५ |
| ३ | चिमणाजी निळकंठ पागे, नासिक. | १५ | ५ |
| ४ | गणेश गोपाळ प्रधान, नासिक. | ५ | ५ |
| ५ | विनायक महादेव कर्णिक, नासिक. | ५ | ५ |
| ६ | नारायण विनायक राजे, नासिक. | ५ | ५ |
| ७ | बाळकृष्ण सखाराम टिपणीस. | १० | ८ |
| ८ | कृष्णराव सिताराम साईकर, नासिक. | ५ | २ |
| ९ | यशवंत रामचंद्र, नासिक. | १० | ५ |
| १० | आप्पाजी विश्वनाथ गडकरी, उरण. | ५ | ५ |
| ११ | रघुनाथ यशवंत शृंगारपुरे, उरण. | ५ | ५ |
| १२ | गोपाळ रामचंद्र टिपणीस, उरण. | ३ | ३ |

| | | | |
|---|---|---|---|
| १३ | सखाराम कृष्ण देशमुख, उरण. | ४ | ४ |
| १४ | बाळकृष्ण नारायण वाम्हणे, उरण. | ३ | ३ |
| १५ | बाबाजी शामराव वढावकर, उरण. | ३ | ३ |
| १६ | मार्तंड अनंत वैद्य, उरण. | २ | २ |
| १७ | यशवंत गणेश मुरबाडकर, उरण. | २ | २ |
| १८ | खंडेराव रघुनाथ भिसे, उरण. | २ | २ |
| १९ | कृष्णराव जयराम गुप्ते, मालेगांव. | २० | २० |
| २० | बहिणाबाई मोकाशीण, निफाड. | ५ | ५ |
| २१ | गणेश सिताराम शृंगारपुरे, उरण | २ | २ |
| २२ | रामचंद्र गोविंद पाटणकर, उरण | २ | २ |
| २३ | रघुनाथ सखाराम प्रधान, उरण | २ | २ |
| २४ | केशव बाळकृष्ण, | २ | २ |
| २५ | विनायक दाजी, | २ | २ |
| २६ | पुरुषोत्तम बळवंत परळीकर, उरण. | २ | २ |
| २७ | रावजी काशिनाथ श्रोत्री, उरण | २८४ | २८४ |
| २८ | आबाजी अमृत कारखाननीस, उरण. | १८४ | १८४ |
| २९ | गणेश यशवंत प्रधान, उरण. | १ | १ |
| ३० | यशवत विनायक रणदिवे, उरण. | १ | १ |
| ३१ | राजाराम महादेव गुप्ते, उरण. | १ | १ |

| | | | |
|---|---|---|---|
| ३२ | नारायण दौलत तासकर, उरण. | १ | १ |
| ३३ | वामन मुकुंद कुळकर्णी, बेलापूर. | १ | १ |
| ३४ | यशवंत गोपाळ भिसे, बेलापूर. | १ | १ |
| ३५ | सखाराम दत्तात्रय. नासिक. | २५ | ५ |
| ३६ | महादेव रामचंद्र पोतनीस, नासिक. | १० | १० |
| ३७ | यशवंत विनायक खारकर, नासिक. | १० | १० |
| ३८ | गोविंद रामचंद्र वढावकर, उरण. | ५ | ५ |
| ३९ | अनंतराव वामन दोंदे, उरण. | २ | २ |
| ४० | वामन नारायण देशपांडे, उरण. | १ | १ |
| ४१ | मार्तंड विठ्ठल सुळे, उरण. | १ | १ |
| ४२ | आप्पाजी त्रिंबक | २ | २ |
| ४३ | विनायक त्रिंबक नागोठणेकर, उरण. | २ | २ |
| ४४ | केशव रामचंद्र भादाणकर, बेलापूर. | १ | १ |
| ४५ | गणेश सिताराम डाहाणूकर, बेलापूर. | १ | १ |
| ४६ | राजाराम गणेश नागोठणेकर. | १ | १ |
| ४७ | वासुदेव सदाशीव रणदिवे, सातारा. | ५० | ५० |

| | | | |
|---|---|---|---|
| ४८ | केशव नारायण चिंचधरकर, नासिक. | १० | १० |
| ४९ | गंगाधर अनंत राजे, साईकर. | १० | १० |
| ५० | वासुदेव विनायक प्रधान. | १० | १० |
| ५१ | जयराम रामचंद्र प्रधान. | ५ | ५ |
| ५२ | नारायण रघुनाथ विळेकर, नासिक. | २ | २ |
| ५३ | परशराम जयराम गुप्ते, सिन्नर. | १० | १० |
| ५४ | बळवंत महादेव वाम्हणे, मालेगांव. | १० | १० |
| ५५ | लक्ष्मण विठ्ठल फणसे, मालेगांव. | ५ | ५ |
| ५६ | बाळकृष्ण सखाराम चिटणीस. | १० | १० |
| ५७ | रावजी गणेश जयवंत. | १० | |
| ५८ | जगंनाथ परशराम टिपणीस. | ५ | |
| ५९ | वामन सिताराम खोपकर. | ३ | |
| ६० | गोविंद चिमणाजी गडकरी. | १० | |
| ६१ | गणेश सदाशिव ठाकरे. | ५० | |
| ६२ | द्वारकानाथ नारायण रणदिवे. | १०० | |
| ६३ | बापूजी महिपत खारकर. | १०० | |
| ६४ | भगवंत बळवंत प्रधान. | ५ | |
| ६५ | नारायण बळवंत भिसे. | १५ | |
| ६६ | आबाजी बळवंत भिसे. | १५ | |

| | | | |
|---|---|---|---|
| ६७ | नारायण अमृत पेढीवाले. | १० | |
| ६८ | मोरोबा जगंनाथ. | १५ | |
| ६९ | भिकाजी गणेश शिळोत्री. | ४ | |
| ७० | सिवाराम लक्ष्मणं | ४ | |
| ७१ | लक्ष्मण बल्लाळ. | ५ | |
| ७२ | बळवंत अनंत गडकरी. | २ | |
| ७३ | विनायक जगंनाथ. | ८ | |
| ७४ | नारायण गोविंद. | २ | |
| ७५ | गणपवराव सखाराम, निफाड. | १० | |
| ७६ | रामराव महिपत मोकाशी, निफाड | ५ | |
| ७७ | बाळकृष्ण आत्माराम गुप्ते. | २५ | २५ |
| ७८ | सिताराम खंडेराव वैद्य. | २५ | २५ |
| ७९ | केशव भगवंत वाम्हणे. | १ | १ |
| ८० | विनायक वामन हार्जीरनीस. | १ | १ |
| ८१ | दत्तात्रय गणेश गुप्ते. | १ | १ |
| ८२ | आत्माराम गणेश गुप्ते. | १ | १ |
| ८३ | नारायण केशव चावक. | २ | २ |
| ८४ | शंकर गोविंद कोतवाल. | १ | १ |
| ८५ | महादेव रावजी चिटणीस. | ३ | ३ |
| ८६ | सखाराम कृष्ण दिक्षीत. | १ | १ |
| ८७ | अनंदराव गणेश टिपणीस. | १ | १ |
| ८८ | गणेश लक्ष्मण जयवंत. | १ | १ |

| | | | |
|---|---|---|---|
| ८९ | दामोदर जगंनाथ कोतवाल. | १ | १ |
| ९० | आत्माराम बाळकृष्ण. | १ | १ |
| ९१ | केशव वामन पत्की. | १ | १ |
| ९२ | आत्माराम बाळकृष्ण हर्जीरनीस. | २ | २ |
| ९३ | बाळकृष्ण आबाजी राजे. | ३ | ३ |
| ९४ | बापूजी गणेश वावंजेकर. | १ | १ |
| ९५ | रावजी सदाशिव गडकरी. | ८ | ८ |
| ९६ | भैराळ नारायण. | ८ | ८ |
| ९७ | बाळकृष्ण आत्माराम फणसे. | १ | १ |
| ९८ | गणेश आत्माराम कर्णीक. | ८ | ८ |
| ९९ | लक्ष्मण शिवराम रणदिवे. | १० | १० |
| १०० | राजाराम खंडेराव वैद्य. | २५ | २५ |
| १०१ | रामचंद्र अनंत शृंगारपुरे पनवेल. | २ | २ |
| १०२ | नारायण अमृत. | १ | १ |
| १०३ | बाळकृष्ण त्रिंबक. | २ | २ |
| १०४ | आत्माराम जयराम गुप्ते. | ५ | ५ |
| १०५ | निळकंठ गोविंद कोर्डे. | १ | १ |
| १०६ | विश्वनाथ नारायण. | २ | २ |
| १०७ | परशराम आत्माराम. | १ | १ |
| १०८ | विष्णु यशवंत दुर्वे. | १ | १ |
| १०९ | नारायण बापूजी रणदिवे. | १ | १ |
| ११० | गणेश केशव बेंद्रे. | २ | २ |

| | | | |
|---|---|---|---|
| १११ | रावजी रामचंद्र बेंद्रे. | ५ | ५ |
| | | ८७१ | ४५६ |